अति. महा.आयुक्त (ज)
पुणे महानगरपालिका
ठराव क्र. :- १/७०४
दिनांक :- ११/५/२०१८

अतिरिक्त महा.आयुक्त (ज)कार्यालय
पुणे महानगरपालिका.
जा.क्र.:- अतिमआ(ज)/उआ(साप्र)/आस्था/९३६२
दिनांक :- ११/०५/२०१८.

## - आज्ञापत्र -

विषय :- पुणे मनपातील कार्यरत कर्मचाऱ्यांमधून किमान ३ वर्षाचा अनुभव व शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या सेवकांची **''आरोग्य निरीक्षक''**(वर्ग-३) (वेतनश्रेणी रु.५२००-२०२००+ ग्रेड पे २८००+ मान्य भत्ते) या पदावर तदर्थ पदोन्नतीने नियुक्ती देणेबाबत.

संदर्भ :- १) दि. ०७/०४/२०१८ मा. खातेनिहाय बढती समिती अहवाल.
२) मा. महापालिका आयुक्त ठ.क्र. १/१४२, दि. ०५/०५/२०१८.

पुणे महानगरपालिकेतील कार्यरत कर्मचाऱ्यांमधून किमान ३ वर्षाचा अनुभव व शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या खालील नमूद सेवकांची **''आरोग्य निरीक्षक''** (वर्ग-३) (वेतनश्रेणी रु.५२००-२०२००+ ग्रेड पे २८००+ मान्य भत्ते) या पदावर तदर्थ पदोन्नतीने नियुक्ती करणेस संदर्भ क्र. १ व २ चे मान्यतेनुसार खालील नमूद सेवकांची त्यांचे नावापुढे दर्शविलेल्या तपशिलानुसार या आज्ञापत्रकाच्या दिनांकापासून तदर्थ पदोन्नतीने (Ad-hoc) नियुक्ती करण्यात येत आहेत.

| अ.क्र | सेवकाचे नाव, सध्याचा हुद्दा व गट | बढतीचा हुद्दा | बढतीचा गट | नेमणूकीचे ठिकाण | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री. कांबळे संजय आनप्पा, कचरा मोटार बिगारी, खुला | आरोग्य निरीक्षक | खुला | घनकचरा व्यवस्थापन विभाग | नवनिर्मित रिक्त जागी हंगामी नेमणूक |
| २ | श्री. जाधव किरण पांडुरंग, फायरमन, खुला | आरोग्य निरीक्षक | खुला | घनकचरा व्यवस्थापन विभाग | नवनिर्मित रिक्त जागी हंगामी नेमणूक |
| ३ | श्रीमती कटके वैशाली प्रदिप (श्रीमती सोनावणे वैशाली ज्ञानेश्वर), दुरध्वनी परिचर, अजा | आरोग्य निरीक्षक | खुला | घनकचरा व्यवस्थापन विभाग | नवनिर्मित रिक्त जागी हंगामी नेमणूक |
| ४ | श्री. ढसाळ प्रमोद रामचंद्र, फायरमन, अजा | आरोग्य निरीक्षक | खुला | घनकचरा व्यवस्थापन विभाग | नवनिर्मित रिक्त जागी हंगामी नेमणूक |
| ५ | श्री. शेख सादिक मुनीर, फायरमन, खुला | आरोग्य निरीक्षक | खुला | घनकचरा व्यवस्थापन विभाग | नवनिर्मित रिक्त जागी हंगामी नेमणूक |
| ६ | श्री. खरात संदिप देविदास, ड्रेनेज बिगारी, अजा | आरोग्य निरीक्षक | खुला | घनकचरा व्यवस्थापन विभाग | नवनिर्मित रिक्त जागी हंगामी नेमणूक |

| अ.क्र | सेवकाचे नाव, सध्याचा हुद्दा व गट | बढतीचा हुद्दा | बढतीचा गट | नेमणूकीचे ठिकाण | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| ७ | श्री. शेख निसार अब्दुलरहीमान, बत्तीवाला, खुला | आरोग्य निरीक्षक | खुला | घनकचरा व्यवस्थापन विभाग | नवनिर्मित रिक्त जागी हंगामी नेमणूक |
| ८ | श्री. खुळे समिर मारूती, सुरक्षारक्षक, खुला | आरोग्य निरीक्षक | खुला | घनकचरा व्यवस्थापन विभाग | नवनिर्मित रिक्त जागी हंगामी नेमणूक |

१) वरील सेवकांची तदर्थ पदोन्नती करण्यात येत असून वरील सेवकांचे काम समाधानकारक नसल्याचे आढळून आल्यास त्यांना कोणतीही पुर्व सुचना न देता त्यांची मुळ जागी पदावनत करण्यात येईल. उपरोक्त सेवकांपैकी आरोग्य विभागाकडे सेवक आवश्यकतेप्रमाणे उपलब्ध करून देण्याची व्यवस्था घनकचरा व्यवस्थापन विभागाकडून करण्यात यावी तसेच सर्व क्षेत्रिय कार्यालये व आरोग्य विभागाची आवश्यकता विचारात घेऊन सेवकांचे आज्ञापत्र प्रस्तृत करून त्याची एक प्रत आस्थापना विभागाकडे पाठविण्यात यावी.

२) मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्र. ३७९७/२०१५ मध्ये दिनांक ०४/०८/२०१७ रोजी दिलेल्या निर्णयान्वये पदोन्नतीमधील आरक्षण अवैध ठरविले आहे. मा. उच्च न्यायालयाच्या विरोधात राज्य शासनाने मा. सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुज्ञा याचिका क्र. २८३०६/२०१७ दाखल केली आहे. सदर याचिका अद्याप प्रलंबित आहे. याबाबत विधी व न्याय विभागाने दि. २८/१२/२०१७ रोजी दिलेल्या अभिप्रायानुसार खुल्या प्रवर्गातील कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्यास कोणतीही वैधानिक अडचण नसल्याचे अभिप्राय दिले आहेत. त्यानुसार तूर्तास पदोन्नतीच्या कोट्यातील खुल्या प्रवर्गातील रिक्त पदे निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात सेवाजेष्ठतेनुसार मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहून भरण्यात यावीत. अशी कार्यवाही करताना सेवाजेष्ठता यादीमधील मागासवर्गीय अधिकारी/कर्मचारी यांना पदोन्नती देण्यापुर्वी ते, दि. २५/०५/२००४ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार आरक्षणाचा लाभ मिळून सेवाजेष्ठता यादीत वरच्या स्थानावर आले नाहीत, याची खात्री प्रत्येक प्रशासकिय विभागाने करावी अशी सूचना सा.प्र.वि./का.१६-ब ने दि. २६/१२/२०१७ च्या पत्रान्वये दिल्या आहेत.

त्यानुसार सदर सेवकांची आरोग्य निरीक्षक पदावरील तदर्थ पदोन्नती मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र. २८३०६/२०१७ च्या अधिन असून पदोन्नतीच्या कोट्यातील खुल्या प्रवर्गातील रिक्त पदावर निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात देण्यात येत आहे. तसेच खालील अटीच्या अधिन राहून सदर पदोन्नती देण्यात येत आहे.

अ) सदर कर्मचाऱ्यांविरूध्द आदेशाच्या दिनांकापर्यंत कोणत्याही प्रकारची विभागीय चौकशी सुरू झालेली नाही.

ब) या तदर्थ पदोन्नतीमुळे संबंधित कर्मचाऱ्यांना नियमित पदोन्नतीचे म्हणजेच जेष्ठतेचे कोणतेही हक्क प्राप्त होणार नाहीत.

क) मागास प्रवर्गातील कर्मचाऱ्यांची पदोन्नती सदर कर्मचाऱ्यांचे जातवैधता प्रमाणपत्र संबंधित जात पडताळणी समितीने निर्गमित केले आहे या अटीच्या अधिन राहून करण्यात येत आहे.

३) वरील नियुक्त्या मे. राज्य शासनाच्यावतीने मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या विशेष अनुमती याचिका डायरी क्र. ३३१५१/२०१७ वर मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहून, शासन निर्णय दि. २५/०५/२००४ मधील तरतुदीनुसार पदोन्नतीमध्ये आरक्षण देऊन करण्यात येत आहेत.

४) पुणे महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम २०१४ यास शासन निर्णय क्र.पीएमसी/३०१४/प्र.क्र.०२/नवि–२२, मंत्रालय, मुंबई ३२, दिनांक २६ ऑगस्ट २०१४ ने मान्यता मिळाली असून त्यातील तरतूदीस अधिन राहून सदरच्या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत.

५) संबंधित सेवकांस मनपा सेवाविनिमयानुसार वेतन व भत्ते आदा करणेत यावेत.

६) वरील सेवक कामावर रुजू होताच त्याप्रमाणे जरुर ते निवेदन संबंधित मा. खातेप्रमुख यांनी आस्थापना विभागाकडे सादर करावे.

४) वरील सेवकांचे नेमणूकीचे संदर्भात जात, शैक्षणिक पात्रता, जन्म दिनांक, अनुभव इत्यादी बाबत सादर केलेली माहिती, कागदपत्रे केव्हाही असत्य असल्याचे आढळून आल्यास त्यांना कोणतीही पूर्वसूचना न देता मूळ पदावर पदावनत करण्यात येईल व सदर सेवकास आरोग्य निरीक्षक या पदावर कोणताही हक्क सांगता येणार नाही. तसेच संबंधितांविरूध्द आवश्यक ती कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.

५) महापालिका आयुक्त कार्यालयाकडील जा.क्र. मआ/उआ(ज)/६९०, दि.८/१०/२०१४ चे कार्यालयीन आदेशामध्ये नमूद केल्याप्रमाणे पुणे महानगरपालिकेतील प्रत्येक मनपा अधिकारी/कर्मचाऱ्याने (वर्ग–४ मधील कर्मचारी वगळता) मनपा सेवेतील कोणत्याही पदावरील नियुक्तीव्दारे त्याच्या प्रथम सेवाप्रवेशाच्या वेळी, अशा नियुक्तीच्या दिनांकापासून दोन महिन्याच्या कालावधीत त्याची स्वत:ची मत्ता व दायित्वे याबाबतची विवरणप्रपत्र १, २ व ३ यातील प्रपत्रामध्ये (म्हणजे (अ) अचल मालमत्तेचे विवरण व चल मालमत्तेचे विवरण आणि (क) कर्जे व दायित्वे याबाबतचे विवरण) ते सध्या कार्यरत असलेल्या खात्यांचे खातेप्रमुखांकडे सादर करावीत.

६) उपरोक्त तदर्थ पदोन्नती दिलेल्या सेवकांना त्यांच्या कामाची जबाबदारी व त्या अनुषंगिक प्रशिक्षण देण्याची कार्यवाही संबंधित मा. खातेप्रमुख यांनी करावी व त्याबाबतचा अहवाल आस्थापना विभागाकडे सादर करावा.

७) जे सेवक १५ दिवसाचे मुदतीमध्ये पदोन्नतीच्या जागेवर रूजू होणार नाहीत अशा सेवकांचे तदर्थ पदोन्नती आदेश व निवड यादीवरील नाव रद्द करण्यात येईल.

या आज्ञापत्रातील उपरोक्त सर्व अर्टी/शर्ती संबंधित सेवकांवर बंधनकारक राहतील.

तरी, संबंधित खातेप्रमुख/विभागप्रमुख यांनी जरुर ती तजविज करावी.

10.05.18

**(शीतल तेली–उगले)**
**अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज)**
**पुणे महानगरपालिका**

**प्रत :–**

| अ.क्र. | सेवकाचे नाव व पदोन्नतीचा गट | अ.क्र. | सेवकाचे नाव व पदोन्नतीचा गट |
|---|---|---|---|
| १ | संबंधित मा. खातेप्रमुख, पुणे म.न.पा. | ६ | श्री. शेख सादिक मुनीर (खुला) |
| २ | श्री. कांबळे संजय आनप्पा (खुला) | ७ | श्री. खरात संदिप देविदास (खुला) |
| ३ | श्री. जाधव किरण पांडुरंग (खुला) | ८ | श्री. शेख निसार अब्दुलरहीमान (खुला) |
| ४ | श्रीमती कटके वैशाली प्रदिप<br>(श्रीमती सोनावणे वैशाली ज्ञानेश्वर)(खुला) | ९ | श्री. खुळे समिर मारूती (खुला) |
| ५ | श्री. ढसाळ प्रमोद रामचंद्र (खुला) | | |

यांजकडे माहितीसाठी व पुढील तजविजीसाठी रवाना---